दि. 08/05/2026

**प्रेसनोट**

## नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसाय विरोधी मोहिम

### आठवडयात (335) गुन्हे दाखल, 2 कोटी 20 लाखांचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक 01 ते 31 मे, 2026 दरम्यान, पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा, मटका/जुगार, अवैध दारु विक्री, शस्त्र अधिनियम व इतर कलमान्वये अवैध व्यवसाय विरोधी मोहिम राबविण्याचे निश्चित केले आहे.

सदर मोहिमे अंतर्गत, दिनांक 01 ते 07 मे, 2026 दरम्यान संपलेल्या पहिल्या आठवड्यात, नांदेड परिक्षेत्रात, गुटखा व्यावसायिकांविरुद्ध कलम 123 भारतीय न्याय संहिते अंतर्गत (7), महाराष्ट्र जुगार कायद्याअंतर्गत (82) महाराष्ट्र दारुबंदी कायदयान्वये (196) व शस्त्र अधिनियम अन्वये (19), तर इतर अधिनियमाखाली (31), अशा एकूण (335) कारवाया करुन (470) इसमांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून 2,20,91,944/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**परिक्षेत्रातील विविध घटकांनी या संदर्भात केलेली कारवाई पुढील प्रमाणे :**

| जिल्हा | गुटखा | | | मटका/जुगार | | | दारु | | | शस्त्र अधिनियम | | | इतर केसेस | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गुन्हे | मुद्देमाल किंमत | आरोपी संख्या | गुन्हे | मुद्देमाल किंमत | आरोपी संख्या | गुन्हे | मुद्देमाल किंमत | आरोपी संख्या | गुन्हे | मुद्देमाल किंमत | आरोपी संख्या | गुन्हे | मुद्देमाल किंमत | आरोपी संख्या |
| नांदेड | 3 | 17,07,526 | 4 | 24 | 11,47,235 | 98 | 71 | 11,67,091 | 75 | 13 | 43,79,400 | 19 | 8 | 66,17,071 | 13 |
| परभणी | 4 | 28,019 | 6 | 21 | 6,35,716 | 42 | 40 | 61,630 | 41 | 3 | 1,51,200 | 6 | 3 | 14,94,500 | 4 |
| हिंगोली | 0 | 0 | 0 | 18 | 1,65,930 | 27 | 43 | 1,16,620 | 43 | 1 | 2,000 | 1 | 14 | 2,03,821 | 14 |
| लातूर | 0 | 0 | 0 | 19 | 2,36,765 | 26 | 42 | 15,89,800 | 43 | 2 | 1,000 | 2 | 6 | 23,86,620 | 6 |
| एकुण | 7 | 17,35,545 | 10 | 82 | 21,85,646 | 193 | 196 | 29,35,141 | 202 | 19 | 45,33,600 | 28 | 31 | 1,07,02,012 | 37 |

परिक्षेत्रात गुटखा, मटका/जुगार, दारु, शस्त्र अधिनियम व इतर कलमान्वये अवैध व्यवसाय विशेष मोहीम ही पुढील आठवड्यात आणखी व्यापकपणे राबविण्यात येणार आहे.

**' खबर ' हेल्पलाइनचा वाप करा :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना देता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवावी, असे आवाहन पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड